तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दुरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
E-mail : diplomadesk10dte@gmail.com Website : www.dte.org.in

अत्यंत महत्वाचे
तातडीचे/कालमर्यादित

क्रमांक : 10/एडीएम/थेट व्दि. वर्ष पदविका/2015/ ५८५
दिनांक : 20 JUN 2015

प्रति,
मा. सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपूर/नाशिक/पुणे.

विषय : शैक्षणिक वर्ष 2015-16 मधील थेट व्दितीय वर्ष पोस्ट एसएससी पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रकियेबाबत...

उपरोक्त विषयाच्या संदर्भात कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष 2015-16 करिता इच्छुक विद्यार्थ्यांकडुन थेट व्दितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे प्रवेश प्रक्रियेमध्ये संचालनालयामार्फत ऑनलाईन अर्ज मागविण्यात येणार आहेत. सदर इच्छुक विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी या संचालनालयाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल. त्यानंतर संबंधित संस्थांनी आपल्या स्तरावरुन जाहीरात देऊन सदर संस्थेत जे विद्यार्थी प्रवेश घेऊ इच्छित असतील त्यांचे अर्ज मागवुन संकेतस्थळावर जाहीर केलेल्या मेरीट व कॅटेगरी मेरीटनुसार संस्थास्तरावर प्रवेश करावयाचे असल्याने थेट व्दितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांचे बदली करण्याबाबत पुढील तक्त्यात सुचविल्याप्रमाणे विहित कालावधीत करण्याबाबतच्या लेखी सुचना आपल्या अधिपत्याखालील सर्व पदविका अभियांत्रिकी संस्थांना तात्काळ देण्यात याव्यात.

| अ. क्र. | थेट व्दितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील बदली करण्याबाबत | बदली करण्याबाबतचा अंतिम दिनांक |
|---|---|---|
| 1. | संस्थेतंर्गत (Within Institute) विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रम बदली करण्याबाबतचा अंतिम दिनांक | दिनांक 04/07/2015 |
| 2. | ☆ तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयातंर्गत असलेल्या संस्थेत (Within Region) विद्यार्थ्यांचे संस्था बदली करण्याबाबतचा अंतिम दिनांक | दिनांक 15/07/2015 |
| | ☆ एका तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयातंर्गत असलेल्या संस्थेमधुन दुसऱ्या तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयातंर्गत असलेल्या संस्थेमध्ये (Outside Region) विद्यार्थ्यांचे संस्था बदली करण्याबाबतचा अंतिम दिनांक | |

**☆ सदर संस्थाबदल प्रकरणात आवश्यक असलेल्या कागदपत्र/Proforma ची पुर्तता होण्यासाठी या संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाची माहितीपुस्तिका पहावी.**

तसेच प्रस्तुत प्रकरणी असे ही नमुद करण्यात येते की, अ. क्र. 1 ते 2 मधील प्रवेश हे थेट व्दितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील एकुण प्रवेशक्षमतेच्या 20% जागा सोडुन उर्वरित रिक्त असलेल्या जागांवर करण्यात यावेत.

(डॉ सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण, म.रा. मुंबई.

प्रत:- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना
1. कार्यासन क्र. 3, मुख्य कार्यालय, मुंबई.
2. प्राचार्य, सर्व पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील संस्था

C:\Users\desk10_\letters\cap 2010-11\Letter mis.doc

दिनांक:- 29 JUN 2015

115